# आदिवासी विकास आयुक्तालय,
## महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन,पहिला मजला, गडकरी चौक, जुना मुंबई-आग्रा रोड, नाशिक -४२२००२
दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७७५१० २५७४२३५, २५७५६१५, २३१७९३८, फॅक्स -२५७९२०८
E-mail- ctdnsk@yahoo.com Website:- www.mahatribal.gov.in

---

**अत्यंत महत्वाचे** क्र.न्युबयो-२०१०/प्र.क्र.३८(१०)/का.३(२)
दि. २० मे २०१०.

प्रति

अपर आयुक्त,
आदिवासी विकास,
नाशिक / ठाणे / अमरावती / नागपूर.

**विषय :- केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (न्युक्लिअस बजेट) सन २०१०-११ मध्ये राबवावयाच्या योजनांचा आराखडा तयार करणेबाबत...**

संदर्भ :- १) आयुक्तालयाचे पत्र क्र.न्युबयो-१०००/प्र.क्र.९/का.२(२) दि.२.५.२०००.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो-२०००/ प्र.क्र.१४४(अ)/का.५ दि.३१.०५.२००१
३) आयुक्तालयाचे पत्र क्र.न्युबयो-१०००/प्र.क्र.९/का.२(२) दि.१०.१०.२०००
४) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.विकास-२००३/न्युबयो/प्र.क्र.५२(०३)/ का-३(१) दि.१९.०१.२००४
५) आयुक्तालयाचे पत्र क्र.विकास-२००६/न्युबयो-मा.सू/प्र.क्र.२(०१)/ का-३(१) दि.०७.०५.२००७

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयास सन २०१०-११ या आर्थिक वर्षात न्युक्लिअस बजेट योजनेसाठी जिल्हानिहाय तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आपण स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन सदर तरतुदीतून उत्पन्नवाढीच्या, प्रशिक्षणाच्या, मानव साधन संपत्ती विकासाच्या व कल्याणात्मक योजना राबविणे अभिप्रेत आहे. सदर योजनांचा लाभ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हा-तालुक्यातील गरजू व पात्र लाभार्थ्यांनाच देणे अपेक्षित आहे.

आपणांस विदितच आहे की, प्रकल्प अधिकारी यांनी प्रथम एकुण उपलब्ध तरतुदीच्या व गटनिहाय अनुज्ञेय तरतुदीच्या मर्यादेत प्रतिवर्षी प्रारुप आराखडा तयार करुन आपल्या कार्यालयामार्फत आयुक्तालयास मंजुरीसाठी सादर करणे क्रमप्राप्त आहे. तरी आपण संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना, परिशिष्ट १ मधील बाबी विचारात घेऊन चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त तरतुदीच्या मर्यादेत आपल्या प्रकल्पाचा प्रारुप आराखडा तयार करावा.

सदर आराखडा तयार करतांना त्यामध्ये खालील बाबी समाविष्ठ असणे क्रमप्राप्त राहील.

१. प्रस्तुत आराखडयात समाविष्ठ करण्यात येणा-या योजनेची स्थानिक भागात गरज असावी.
२. सदर योजनेमुळे रोजगार निर्मीती, कौशल्य / क्षमतावृध्दी, समस्या निवारण होणे असे फलनिष्पत्तीदर्शक बदल घडावेत.
३. एकच योजना पुन्हा पुन्हा प्रतिवर्षी प्रस्तावित नसावी.
४. प्रस्तुत योजना नियमित योजनेतील (जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतील) नसावी.

५. प्रस्तुत योजना विशेष केंद्रीय सहाय्य योजना / भारतीय संविधानाच्या २७५(१) अंतर्गत योजना / केंद्रीय क्षेत्र योजनेंतर्गत आदिम जमाती विकासाच्या योजनांच्या वार्षिक प्रारुप आराखडयात समाविष्ठ नसावी.

६. प्रस्तुत योजनेचा खर्च प्रतिलाभार्थी खर्च मर्यादा (रु.१५०००/-) पेक्षा अधिक नसावा.

७. प्रस्तुत योजनेत नमुद दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत तसेच दरनिश्चितीसाठी निश्चित स्वरुपाचा आधार असावा, दर अंदाजित नसावेत.

८. योजना कार्यान्वित करणारी यंत्रणा सक्षम, नामांकित व सर्वसुविधायुक्त असावी. सदर यंत्रणेकडे प्रशिक्षीत अनुभवी कर्मचारीवृंद असावा.

९. नियमित योजना प्रस्तावित असल्यास सदर योजना राबविण्याचे पुरेसे समर्थन / अनुषंगिक बाबींसह शेरास्तंभात नमुद असावे. जेणेकरुन अशा योजनेस नियम १२ खाली शासनाची मंजुरी घेणे सुलभ होईल. (परिशिष्ट ४)

१०. योजनेंतर्गत करण्यात येणारी खरेदी आकस्मिक खर्च नियमावली, शासन निर्णय दि.०२ जानेवारी १९९२ व तत्सम मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन करणे प्रस्तावित असावी.

उक्त बाबी समावेशक प्रारुप आराखडा पुरेशा समर्थनासह प्रकल्प अधिकारी यांनी अपर आयुक्त कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. अपर आयुक्त कार्यालयाने सदर आराखडयाची छाननी करुन त्यात स्थानिक गरजेनुरुप उचित बदल करुन प्रकल्पनिहाय प्रारुप आराखडा आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आयुक्तालयास सादर करावयाचा आहे. त्यानुसार आपण पाठपुरावा करुन मुदतीत आपला प्रारुप आराखडा आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. त्यानुषंगाने सोबत कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन देण्यात येत आहे. (परिशिष्ट ३) सदर कार्यक्रमाचे सर्व स्तरावर काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

११. त्यानुसार आपणांस प्रारुप आराखडा मंजुरी मिळाल्यानंतर आपण आराखडयातील योजनांना पुरेशी प्रसिध्दी देवून लाभास उत्सुक आदिवासी बांधवांकडून अर्ज मागवावेत. प्राप्त अर्जांची तालुकानिहाय ज्येष्ठता यादी तयार करुन सर्व तालुक्यांना समान न्याय तत्वाचा वापर करुन योजनानिहाय लाभार्थी यादी तयार करावी व योजनेच्या प्रारुपासोबत निर्देशन समितीसमोर सादर करावी तसेच संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयाच्या ९ (ब) मधील क्र.६ मध्ये नमुद केल्यानुसार सहपत्र अ मध्ये योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती जतन करावी. योजनेशी निगडीत कार्यान्वयीन यंत्रणा / प्रशिक्षण संस्था निश्चितीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात / विनाखर्च बातमी प्रसिध्द करुन नामांकित यंत्रणांकडून प्रस्ताव मागवावेत. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावातून आवश्यक तेवढया यंत्रणा निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत योजना लाभार्थी व कार्योन्वित यंत्रणा निवडीमध्ये पारदर्शकता राहील व कोणत्याही प्रकारची तक्रार उद्‌भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. ब गटातील प्रशिक्षणाच्या योजना मंजुर करतांना अथवा आयुक्तालयाकडे मंजुरीसाठी सादर करतांना अपर आयुक्त कार्यालयाचे मुख्यालयाच्या ठिकाणी असलेले उपसंचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांचा निर्देशन समितीचे सदस्य म्हणून सहभाग घेणे आवश्यक राहील.

वरील १ ते १२ बाबींप्रमाणे कार्यवाही होणे अभिप्रेत आहे परंतू त्याप्रमाणे पालन होत नाही, त्यामुळे आराखडयात परिशिष्ट २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे त्रुटी निदर्शनास येतात. सदर त्रुटी निर्माण होणार नाहीत, यादृष्टीने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. तसेच या पत्रासोबतच्या परिशिष्ट १ ते ६ मध्ये नमुद सर्व निर्देशांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक करण्यात येत आहे. तरी सोबतच्या प्रपत्रात (परिशिष्ट ५) प्रकल्पनिहाय प्रारुप आराखडा १५ दिवसांत आयुक्तालयास सादर करावा. त्यानुसार आराखडयास मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्प कार्यालयाकडून सोबतच्या कालबध्द कार्यक्रमानुसार प्राप्त होणा-या योजनांना अपर आयुक्त

यांनी निर्धारित वेळेत मंजुरी द्यावी व त्याचा सोबतच्या नमुन्यात त्रैमासिक अहवाल (परिशिष्ट ६) आयुक्तालयास सादर करावा.

स्वाक्षरीत/-
आयुक्त,
आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

## परिशिष्ट १
## न्युबयो व न्युबयो प्रारुप आराखडा मार्गदर्शक सुचना

| अ.क्र. | योजना | अ.क्र. | प्रारुप आराखडा |
|---|---|---|---|
| १ | नियमीत अर्थसंकल्पात नसलेल्या योजना राबविणे. | १ | प्रतिवर्षी १० एप्रिल पर्यंत प्रकल्प क्षेत्रातील अंमलबजावणी अधिका-यांकडून योजनांचे प्रस्ताव प्राप्त करणे. |
| २ | आदिवासी व्यक्ती /कुटूंब केंद्रस्थानी गृहीत धरुन त्यानुसार योजना राबविणे. | २ | गरजू आदिवासी भाग व गरजू लाभार्थी निश्चित करणे व त्यानुसार त्यांचा सर्वांगीण विकासास चालना देणा-या योजना निश्चित करणे |
| ३ | कर्ज विरहीत योजना | ३ | अंमलबजावणी अधिका-यांकडून प्राप्त योजना व उक्त क्र. २ मध्ये नमुद गरजू क्षेत्र व व्यक्तींच्या विकासास आवश्यक योजना यांचा संकलीत आराखडा तयार करणे व अपर आयुक्त स्तरावर २५ एप्रिल पर्यंत निर्देशन समिती बैठक घेवून योजनांची निश्चिती करणे |
| ४ | स्थानिक गरजेनुरुप स्थलकालपरत्वे योजनांची निवड | ४ | अनुदान मर्यादा लोकसंख्येच्या प्रमाणात प्रकल्प क्षेत्रातील प्रत्येक तालुक्यात सम प्रमाणात निधी व लाभार्थी निश्चिती |
| ५ | अ गटासाठी अनुदानाची मर्यादा<br>१) सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी ८५ टक्के<br>२) आदिम जमाती ९५ टक्के<br>३) जेथे अर्थसहाय्य २००० पेक्षा कमी / बी.पी.एल असल्यास १०० टक्के | ५ | गटनिहाय खर्चमर्यादा अ व ब ४० टक्के, क १५ टक्के व ड ५ टक्के या मर्यादेत प्रारुप आराखडयाची विभागणी करणे. |
| ६ | प्रति लाभार्थी १०० टक्के किंवा रुपये १५०००/- (फक्त गट ब, क, ड) | ६ | कोणत्याही परिस्थितीत दरमहा १० टक्के निधी खर्च करणे. |

## परिशिष्ट २

## प्रस्तावात आढळून येणा-या त्रुटी

१) निर्धारित कालावधीत योजना आराखडे प्राप्त होत नाहीत व आराखडयास मान्यता दिली जात नाही अथवा घेतली जात नाही. आराखडयातीलच योजना राबविल्या जातातच असे नाही.

२) गटनिहाय खर्च मर्यादेतच खर्च केला जात नाही. अनेकवेळा गटनिहाय खर्च मर्यादेचे उल्लंघन करण्याचे परवानगी मागितली जाते. एकच योजना वर्षभरात वेगवेगळया टप्प्यात मंजूर केली जाते त्यामुळे अजाणतेपणे वित्तीय मर्यादेचे व गटनिहाय खर्च मर्यादेचे उल्लंघन होते. तुकडयांत योजना न राबविता एक योजना एकदाच मंजूर करणे आवश्यक आहे.

३) त्याच त्याच योजना प्रतिवर्षी राबविल्या जातात. अशा योजना राबविणे उपयुक्त / आवश्यक असल्यास सदर योजना नियमित योजनेत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव सादर केले जात नाहीत. (उदा. एम.एच.टी.-सी.ई.टी., स्पर्धा परीक्षापुर्व प्रशिक्षण)

४) मान्यताप्राप्त संस्था व मान्यताप्राप्त प्रशिक्षण अभ्यासक्रम या निकषांचे पालन केले जात नाही.

५) आयुक्तालयाची कार्योत्तर मंजूरी गृहीत धरुन योजनांना मंजूरी दिली जाते.

६) नियमित योजना न्युबयो अंतर्गत घेण्यात विशेष भर दिसून येतो. उदा.बैलगाडी, बियाणे, खते, औषधे, दुधाळ जनावरे, बचत गट इ.

७) दरमहा १० टक्के मर्यादेत गटनिहाय खर्च न करता शेवटच्या तिमाहीत योजना मंजूरी व अंमलबजावणीची घाई करण्यात येते त्यामुळे मोठया प्रमाणावर अनियमितता होते.

८) विकेस / २७५(१) / पी टी जी अंतर्गत घेतल्या जाणा-या योजना न्युबयो अंतर्गत घेण्याकडे कल दिसून येतो.

९) नियमित योजना राबविणे आवश्यक असल्यास शासनाची परवानगी घेण्याचे प्रस्ताव सादर केले जात नाही.

१०) जिल्हा / तालुका, दुर्गम संकूल निहाय लाभार्थी निश्चिती ऐवजी केवळ शहरालगतच्या गावातील / शहरातील लाभार्थी निवडीस प्राधान्य दिले जाते. त्यामुळे समान न्यायाच्या धोरणाला बाधा येते.

११) शासन निर्णयानुसार प्रतिवर्षी मागील वर्षात राबविलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन आयुक्तालयास अहवाल सादर होत नाहीत.

१२) रुपये ७.५० लाखावरील योजनांची व्यवस्थित छाननी न करता आयुक्तालयास मंजुरीसाठी सादर करण्यात येतात.

वरीलप्रमाणे त्रुटी निर्माण होणार नाहीत याची दक्षता प्रकल्प अधिकारी यांनी घेणे अपेक्षित आहे तसेच अपर आयुक्त यांनी सदर बाबतीत विशेष लक्ष केंद्रीत करुन योजना मंजुरीचा निर्णय घेणे अभिप्रेत आहे.

## परिशिष्ट ३

## न्युक्लिअस बजेट प्रारुप आराखडा व गटनिहाय योजना अंमलबजावणी कालबध्द कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प क्षेत्रातील अंमलबजावणी अधिकारी यांजकडून प्रस्ताव मागविणे. | १ एप्रिल | १० एप्रिल |
| २ | वर्षभरात लोकप्रतिनिधी / लाभार्थी / जनता यांजकडून प्राप्त मागणी / तक्रारी विचारात घेवून त्याअनुषंगाने योजना प्रस्तावित करणे. | १ एप्रिल | १० एप्रिल |
| ३ | वरीलप्रमाणे प्राप्त प्रस्ताव / मागणी विचारात घेवून गटनिहाय योजना प्रारुप आराखडा प्रारुप तयार करणे. | ११ एप्रिल | १५ एप्रिल |
| ४ | कार्यालयातील कक्ष अधिकारी, नियोजन शाखा / कक्ष अधिकारी, केंद्रीय योजना शाखा / लेखा अधिकारी यांची बैठक आयोजन करुन सदर प्रारुपावर चर्चा करणे | १६ एप्रिल | १६ एप्रिल |
| ५ | सदर चर्चेनुसार व्दिरुक्ती असलेल्या योजना वगळणे व त्याऐवजी नविन योजना समाविष्ठ करणे तसेच चर्चेत सुचविण्यात आलेल्या सुधारणा करुन प्रारुप आराखडा अंतिम करणे. | १६ एप्रिल | १७ एप्रिल |
| ६ | सदर आराखडा अपर आयुक्त, यांस सादर करणे. | १८ एप्रिल | १८ एप्रिल |
| ७ | अपर आयुक्त कार्यालयाकडून छाननी करुन निर्देशन समितीसमोर प्रारुप आराखडा सादर करणे. | १९ एप्रिल | २४ एप्रिल |
| ८ | शिफारशीसह आयुक्तालयास प्रारुप आराखडा मान्यतेसाठी सादर करणे. | २५ एप्रिल | ३० एप्रिल |
| ८ | आयुक्तालयाने प्राप्त आराखडयांची छाननी करणे. (प्रतिदिन १ अपर आयुक्त विभाग) | ०१ मे | ५ मे |
| ९ | छाननीत आढळून आलेल्या त्रुटी नमुद करुन प्राप्त आराखडयास मंजुरी देणे व अपर आयुक्तांना आराखडे परत पाठविणे. | ६ मे | ७ मे |
| १० | अपर आयुक्तांनी मंजुर आराखडयानुसार योजनांचे राईट अप (मसुदे) सादर करणेबाबत प्रकल्प कार्यालयांना कळविणे. | ८ मे | ८ मे |
| ११ | प्रकल्प कार्यालयाने योजनानिहाय राईट अप (मसुदे) अपर आयुक्तांस सादर करणे. | ९ मे | १५ मे |
| १२ | अपर आयुक्तांनी राईट अप तपासून न्युबयो मार्गदर्शक सुचना, वित्तीय नियमावली, स्थानिक आवश्यकता, अपेक्षित फलनिष्पत्ती वगैरे बाबी विचारात घेवून योजनांना लाभार्थी यादी व कार्यान्विन यंत्रणा / संस्था यादी मंजुरीसाठी सादर करण्याच्या अटीवर योजनांस मंजुरी देणे. त्यासाठी प्रकल्पनिहाय निर्देशन समितीच्या बैठकीचे आयोजन. | १६ मे | २२ मे |
| १३ | त्यानुसार प्रकल्प अधिकारी यांनी संस्था व लाभार्थी निश्चितीसाठी वर्तमानपत्रात विनाखर्च बातमी प्रसिध्द करणे व उत्सुक मान्यताप्राप्त संस्थांकडून प्रस्ताव मागविणे तसेच योजनेचा लाभ घेवू इच्छिणा-या उत्सुक उमेदवारांकडून लाभासाठी अर्ज मागविणे. | २३ मे | २६ मे |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | त्यानुसार प्राप्त होणारे प्रस्ताव / अर्ज नुसार संस्था निश्चित करणे. | २७ मे | २७ मे |
| १५ | प्राप्त अर्जाची तालुकानिहाय ज्येष्ठता यादी तयार करुन योजनानिहाय लाभार्थी निवड करणे. | २८ मे | ०५ जुन |
| १५ | निश्चित केलेल्या लाभार्थ्यांची यादी व संस्थांची यादी मान्यतेसाठी अपर आयुक्तांस पाठविणे. | ०६ जुन | ०६ जुन |
| १६ | अपर आयुक्त यांनी सदर संस्था व लाभार्थी यादीस न्यु.ब. यो मार्गदर्शक सुचनांनुसार मान्यता देणे. | ०७ जुन | १० जुन |
| १७ | प्रकल्प कार्यालयाने मान्य संस्थांना कार्यारंभ आदेश देणे व मान्य लाभार्थींना लाभासाठी कळविणे | ११ जुन | १४ जुन |
| १८ | मंजुर योजना कार्यारंभ | १५ जुन पासून | संबंधित योजनेच्या कार्यकालापर्यंत |

टीप :- सदर कार्यक्रम सन २०१०-११ पासून बंधनकारक राहील. प्रतिवर्षी प्रारुप आराखडा सादरीकरणाबाबत आयुक्तालयाच्या निर्देशाची अपेक्षा न करता वरील कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे, याची सर्व प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांनी नोंद घ्यावी.

# <u>परिशिष्ट ४</u>

## <u>न्युक्लिअस बजेट अंतर्गत वित्तीय मर्यादेपेक्षा अधिक रकमेची अथवा नियमित योजना (नियम १२) राबविण्यासाठी आयुक्तालयास सादर करावयाचा प्रस्ताव नमुना</u>

प्रति,
मा.आयुक्त,
आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

विषय :- न्युक्लिअस बजेट अंतर्गत सन -------------- मध्ये वित्तीय मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रक्कम रुपये --------------- च्या --------------- या योजनेस मंजुरी मिळणेबाबत..

संदर्भ :- १) आयुक्तालयाचे पत्र क्र. --------------- अन्वये मंजुर न्यु.ब.यो प्रारुप आराखडा सन ---------------
२) या कार्यालयाचे पत्र क्र. --------------------- अन्वये प्रस्तुत योजनेस यापुर्वी देण्यात आलेली मंजुरी. (लागू असल्यास)
३) प्रकल्प अधिकारी, ------------- यांचे पत्र क्र. --------- दि. -------------

महोदय,

--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------

प्रस्तुत योजनेबाबत खालील प्रमाणे तपशील सादर करण्यात येत आहे.

१) योजनेचे नांव :- --------------------------------------------------------------------------
२) प्रकल्प कार्यालय :- -------------------------------------
३) योजनेचा गट :- -------------------------
४) योजनेची रक्कम :- -------------------------------------------
५) सदर योजना जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत समाविष्ट आहे काय?:- होय / नाही
असल्यास, सदर योजनेसाठी आपल्या जिल्हयास मंजुर असलेला नियतव्यय रु. -------- प्राप्त तरतुद रु. -----------------
६) योजना न्यु.ब.यो प्रारुप आराखडयात समाविष्ट आहे किंवा नाही :- होय / नाही
७) नसल्यास योजना प्रस्तावित करण्याचे समर्थन / कारण :- ------------------------------ ---------------------------------------------------------------------------------------- ---------------------------------------------------------------------------------------- ----------------
८) योजना ज्या गटात प्रस्तावित केली आहे त्या गटात प्रस्तावित योजनेसाठी निधी उपलब्ध आहे काय? :- होय / नाही असल्यास रु. :- ------------------------------ ------------
निधी शिल्लक नसल्यास संदर्भिय आराखडयाच्या उक्त गटातील कोणत्या योजनेऐवजी सदर योजना राबविणे प्रस्तावित आहे? :- त्या योजनेचे नांव --------- रक्कम रु.-----
९) कार्यान्वयीन यंत्रणा :- ------------------------------------------------------------------

१०) सदर यंत्रणेची निवड करण्यासाठी अवलंबिलेली / प्रस्तावित कार्यपध्दती :-
त्याबाबत प्रकल्प कार्यालयाचा संस्था तपासणी अहवाल :-
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

११) लाभार्थी निवडीबाबत अवलंबिलेली / प्रस्तावित कार्यपध्दती व निकष :-
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

१२) प्रस्तुत योजनेत नमुद दर कशाच्या आधारे प्रस्तावित केलेले आहेत? :-
------------------------------------------------------------------------------------------

१३) प्रशिक्षण योजना असल्यास त्यास कोणत्या यंत्रणेची मान्यता आहे?
------------------------------------------------------------------------------------------

१४) प्रशिक्षण देणारी संस्था शासनमान्यताप्राप्त आहे का ? असल्यास, मान्यता देणा-या शासकीय विभागाचे नांव :- ------------------------------------------------

१५) प्रस्तावित अभ्यासक्रम शासन मान्य आहे काय? ---------------------------------------

१६) प्रस्तुत योजनेचा लाभ किती गावातील लाभार्थ्यांना देणे प्रस्तावित आहे?------------
त्या गावांमध्ये सदर व्यवसाय / योजनेस असलेला वाव याबाबत संक्षिप्त तपशील :
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

१७) न्यु.ब.यो. अंतर्गत प्रकल्पास प्राप्त तरतुद व त्याचे गटनिहाय वर्गीकरण :-

| तपशील | अ गट<br>४० टक्के | ब गट<br>४० टक्के | क गट<br>१५ टक्के | ड गट<br>५ टक्के | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| गटनिहाय खर्च टक्केवारी नुसार तरतुद | | | | | |
| मंजुर योजना रक्कम | | | | | |
| शिल्लक निधी | | | | | |
| उक्त मंजुर योजनांवर आजपर्यंत झालेला खर्च | | | | | |

**परिशिष्ट ६**

**न्युक्लिअस बजेट योजना मंजुर प्रारुप आराखडा सन ........................**

**गटनिहाय मंजुरी दिलेल्या योजनांचा**

**अपर आयुक्त कार्यालयाने सादर करावयाचा**

**त्रैमासिक अहवाल .**

प्रकल्प कार्यालय :-

| अ.क्र | अ गटातील योजनांची नांवे | तरतुद | लक्ष्यांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

| अ.क्र | ब गटातील योजनांची नांवे | तरतुद | लक्ष्यांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

| अ.क्र | क गटातील योजनांची नांवे | तरतुद | लक्ष्यांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

| अ.क्र | ड गटातील योजनांची नांवे | तरतुद | लक्ष्यांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |